# एम.फिल., पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया होणार ऑनलाईन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एम.फिल. तसेच पीएच.डी. अभ्यासक्रमांसाठी येत्या शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन राबविण्यात यावी, असे आदेश शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिले आहेत. याबाबतच्या सूचना विभागप्रमुख, संचालक, प्राचार्य, समन्वयक यांना देण्यात आल्या आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाची एम.फिल., पीएच.डी. विद्यार्थ्यांसाठी अंतिम मुलाखती विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शन सूचनांनुसार ऑनलाईन पद्धतीने राबवण्यात येत आहेत. मार्गदर्शक सूचनांचे पालन करून विषाणूचा कोणत्याही प्रकारे प्रसार होऊ नये, याची काळजी घेत प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. तसेच मुलाखतींचे व्हिडीओ कॉन्फरन्सिगद्वारे घेण्यात आलेले रेकॉर्ड कायमस्वरूपी जतन करण्यात यावेत. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित विषयातील तज्ज्ञ आणि परीक्षकांच्या स्वाक्षरीसह लेखी अहवाल पुढील कारवाईसाठी विद्यापीठाच्या पीजी बीटीयूआर या विभागाकडे सादर करावा, असे आदेश देण्यात आले आहेत.